नाशिक
दि. १०/०८/२०२१

# प्रेसनोट

**आलोसे क्र.(१) श्रीमती वैशाली पंकज विर, शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद नाशिक (२) ज्ञानेश्वर सूर्यकांत येवले शायकीय वाहक चालक, (३) पंकज रमेश दशपुते, प्राथमिक शिक्षक, जि.प. शाळा राजेवाडी, ता.जि.नाशिक यांनी ८,००,०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक (प्रत्यक्ष कारवाई ला.प्र.वि.ठाणे पथकाने केली आहे.) |
| गुन्हा नोंद क्रमांक | कार्यवाही सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन–१९८८ चे कलम ७, प्रमाणे |
| आरोपींचे नांव व कार्यालय | (१) श्रीमती वैशाली पंकज विर, शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद नाशिक<br>(२) ज्ञानेश्वर सूर्यकांत येवले शायकीय वाहक चालक,<br>(३) पंकज रमेश दशपुते, प्राथमिक शिक्षक, जि.प. शाळा राजेवाडी, ता.जि.नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ९,००,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ८,००,०००/– रुपये (तडजोडीअंती) |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांच्या संस्थेच्या शाळांना मंजूर झालेल्या २०% अनुदानाप्रमाणे नियमित वेतन सुरु करण्याबाबतचा कार्यादेश काढून देण्याकरीता **आलोसे क्र.३)** पंकज रमेश दशपुते, प्राथमिक शिक्षक, जि.प. शाळा राजेवाडी, ता.जि.नाशिक यांनी **आलोसे क्र.१)** श्रीमती वैशाली पंकज विर, शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद नाशिक यांचे करीता ९,००,०००/– रुपये लाचेची मागणी केली त्यांनंतर दि.२७/०७/२०२१ रोजी **आलोसे क्र.१)** श्रीमती वैशाली पंकज विर, शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद नाशिक यांची ला.प्र.वि.ठाणे पथकाने पडताळणी केली असता त्यांनी सदर कामाकरीता तडजोडीअंती ८,००,०००/– रुपये स्विकारण्याचे मान्य करुन लाचेचे पुढील व्यवहार त्यांचे चालक **आलोसे क्र.२)** ज्ञानेश्वर सूर्यकांत येवले शायकीय वाहक चालक यांचे सोबत करण्याबाबत सांगितले.<br>त्यावरुन ला.प्र.वि.ठाणे पथकाने सापळा आयोजित केला असता **आलोसे क्र. २)** ज्ञानेश्वर सूर्यकांत येवले शायकीय वाहक चालक यांनी **आलोसे क्र.१)** श्रीमती वैशाली पंकज विर, शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद नाशिक यांचेकरीता तक्रारदार यांचेकडून **८,००,०००/– रुपये** लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आज दिनांक १०/८/२०२१ रोजी पंचसाक्षीदार यांचे समक्ष **स्विकारतांना** त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारसंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्यशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र नाशिक कार्यालय
संकेतस्थळ : acbmaharashtra.gov.in
ई–मेल : spacbnasik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार : acbmaharastra.net
टोल फ्री क्र. : १०६४
दुरध्वनी क्र. : ०२५३–२५७५६२८, २५७८२३०
व्हॉटस ॲप क्र. : ९९३०९९७७००

पोलीस उपआयुक्त/पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, नाशिक परिक्षेत्र, नाशिक

( सतीश भामरे )
पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
नाशिक परिक्षेत्र, नाशिक